RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३४(६)] मंगळवार, ऑगस्ट ३०, २०१६/भाद्र ८, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २०.**—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश .. .. .. | पृष्ठे १-५ |


**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० ऑगस्ट २०१६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XX OF 2016.**

*AN ORDINANCE*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURE PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

**सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २०.**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

२०१६ चा महा.अध्या. १५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१६ हा दिनांक ५ जुलै २०१६ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १८ जुलै २०१६ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधान मंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ (सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४) हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांनंतर म्हणजेच, २८ ऑगस्ट २०१६ या दिनांकानंतर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद होईल ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ; आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ५ जुलै २०१६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— १९६४ चा महा.२०.

(क) खंड (फ-१अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

" (फ-१ब) "ई-पणन" याचा अर्थ, आनुषंगिक कार्यासह कृषि उत्पन्नाचे इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे पणन, असा आहे ;";

(ख) खंड (ह) मध्ये, " या अधिनियमाच्या " या मजकुरानंतर, " कलम ५ खालील " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२अ) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीस, कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या बाजाराबाहेर, अनुसूचीतील बाब (सात) फळे आणि (आठ) भाजीपाला यांखालील सर्व नोंदीत, आणि बाब (दहा) व्यंजने, मसाल्याचे व इतर पदार्थ याखालील नोंदी (२), (३), (४) आणि (५) यात विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाचे पणन करण्यासाठी, कलम ५ड मध्ये तरतूद केली असेल त्याखेरीज, कोणत्याही लायसनची किंवा परवानगीची आवश्यकता भासणार नाही, आणि अशा पणनाचे बाजार समितीकडून विनियमन केले जाणार नाही.".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये,— सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३१ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, तिसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, ज्या कृषि उत्पन्नाच्या संबंधात इतर कोणत्याही बाजार समितीने, खाजगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार, विशेष वस्तूंचा बाजार किंवा राज्यातील थेट पणन अंतर्गत या कलमाखालील फी या अगोदरच बसविलेली असेल आणि ती वसूल केलेली असेल अशा कृषि उत्पन्नाच्या संबंधात, किंवा कोणत्याही बाजार क्षेत्रात कोणतीही यंत्रसामग्री किंवा कामगार यांच्या मदतीविना चालविण्यात येणाऱ्या उद्योगामध्ये गुंतलेल्या व्यक्तींनी खरेदी केलेल्या घोषित कृषि उत्पन्नाच्या संबंधात, कोणत्याही बाजार क्षेत्रात अशी कोणतीही फी बसविता येणार नाही आणि ती वसूल करण्यात येणार नाही.";

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " अडत्यानी " या मजकुराऐवजी, " खरेदीदारांकडून अडत्यांनी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०१६ चा महा. अध्या. १५.

५. (१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१६, हा, याद्वारे, मागे घेण्यात येत आहे. सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ मागे घेऊन त्याचे निरसन करणे व व्यावृत्ती.

(२) उक्त अध्यादेश, अशा प्रकारे मागे घेण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा काढण्यात आलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## निवेदन.

बाजार क्षेत्रातील शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या पणनाचा, आणि त्यासाठी राज्यात स्थापन केलेल्या बाजारांचा तसेच, खाजगी बाजारांचा व शेतकरी-ग्राहक बाजारांचा विकास व विनियमन करणे, अशा बाजारांच्या संबंधात स्थापन करावयाच्या किंवा बाजारांशी संबंधित असलेल्या प्रयोजनासाठी कार्य करणाऱ्या बाजार समित्यांना अधिकार प्रदान करणे, आणि बाजार समितीच्या प्रयोजनासाठी बाजार निधी स्थापन करणे आणि पूर्वोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे, यांसाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (सन १९६४ चा महा. २०) अधिनियमित केला आहे.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २००५ (२००५ चा महा. ४८) याद्वारे उक्त अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे, त्याद्वारे शेतकऱ्यांकरिता त्यांचे कृषि उत्पन्न विकण्यासाठी विभिन्न पर्यायी बाजारांचे विकल्प निर्माण करण्यात आले आहेत. २००५ च्या उक्त सुधारणा अधिनियमाद्वारे, उक्त अधिनियमात खाजगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार, विशेष वस्तूंचा बाजार स्थापन करण्याच्या, थेट पणन आणि कंत्राटी शेती कराराबद्दलच्या तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या विभिन्न पर्यायी पणन व्यवस्थेअंतर्गत होणारे व्यवहार हे केवळ संबंधित बाजार समित्यांसाठी अधिसूचित केलेल्या बाजार क्षेत्रांतर्गतच होतात.

३. शेतकरी आणि ग्राहक यांच्या सौदा शक्तीची जास्तीत जास्त सुनिश्चिती व्हावी, आणि निकोप स्पर्धा वाढीस लागावी, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नासाठी रास्त किंमत मिळणे शक्य होईल, म्हणून, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिनियमात विवक्षित सुधारणा करणे इष्ट वाटले. त्यावेळी प्रस्तावित केलेल्या सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(एक) कृषि उत्पन्नाचे ई-पणन करण्याची तरतूद समाविष्ट केल्याने, त्याद्वारे ऑनलाईन बाजार (virtual markets) स्थापन करण्याची मुभा मिळेल, ज्यातून कमीत कमी खर्च होईल आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नाची वाजवी किंमत मिळेल ;

(दोन) कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या बाजाराबाहेर होणाऱ्या कायदेशीर व्यवहारांना परवानगी देऊन फळे व भाजीपाल्याच्या व्यापाराचे उदारीकरण करण्यासाठी केवळ बाजारांतर्गत होणाऱ्या फळांचे आणि भाजीपाल्याच्या पणनाचे विनियमन हे, संबंधित बाजार समितीकडून केले जाईल. त्याद्वारे बाजाराकडून देण्यात येणाऱ्या संरक्षणाबरोबरच शेतकऱ्यांना आणखी जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी पर्यायी पणन मार्गाची तरतूद करणे ;

(तीन) कृषि उत्पन्नाची मुक्त आवक होण्यासाठी आणि त्या कृषि उत्पन्नाचा व्यापार सुरळीत चालण्यासाठी, एका ठिकाणीच फी बसविण्याची तरतूद समाविष्ट करणे.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक ५ जुलै २०१६ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५) प्रख्यापित केला होता.

५. त्यानंतर, दिनांक १८ जुलै २०१६ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ (सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४) महाराष्ट्र विधानसभेने